## नाते तुटता तुटता वाटे

पुन्हा एकदा त्या वाटेवर
हात उसवूनी जाता जाता
जगलो मरणा पुन्हा एकदा
नवा जन्म हा घेता घेता

नाते तुटता तुटता वाटे
नाळ पुन्हा ही कुठे पुरावी
कुठे कशी अन कशास आता
माया ममता उरी धरावी

हात मोकळे झाले आता
दुजा कुणाचा हात धरावा?
उगाच वणवण करता करता
असा आसरा का शोधावा?


## नरेंद्र प्रभू

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/